दि. ०१.०१.२००५ पूर्वी पदभरती जाहिरात/अधिसुचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन दि. ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजु झालेल्या शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्तीवेतन योजना लागु करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई.**
**कस्तुरी इमारत, तळ मजला, जे. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर**
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०**

दुरध्वनी क्र. ०२२-२२८८०१०६/०७ E-Mail : aaoadmin-dat@mah.gov.in

आदेश क्र. संलेको-११-२०२४/प्रशा-राप-सलेअ/टिस-४/०२.०२.२०२४/जु.नि.वे./न.क्र.आर३६३०/804 दिनांक : 29 NOV 2024

**संदर्भ:-**

१. वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.४६/सेवा-४, दि.०२.०२.२०२४.
२. शासन वित्त विभाग परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१८/सेवा-४, दि.०२.०५.२०२४.
३. दि.११.११.२०२४ रोजीच्या बैठकिचे इतिवृत्त.

**आदेश:**

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण २०२३ / प्र. क्र. ४६ / सेवा-४, दि.०२.०२.२०२४ अन्वये, दि.०१.११.२००५ पूर्वी पदभरती जाहिरात / अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्यासाठी एक वेळ पर्याय देण्यात आला आहे.

**२.** त्यानुसार, महाराष्ट्र वित्त व लेखा गट-ब (राप) सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गातील खालील नमूद अधिकाऱ्यांनी केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्याबाबत विनंती केली आहे.

**३.** शासन निर्णय, वित्त विभाग दि.०२.०२.२०२४ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील खालील नमूद अधिकारी यांची खालील तक्यातील स्तंभ-३ मध्ये नमूद केलेल्या दिनांकास म्हणजेच ०१.११.२००५ पूर्वी पदभरती / जाहिरात / अधिसूचना निर्गमित झाली असल्याने त्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्यात येत आहेत.

| अ. क्र | अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व कार्यालय | पदभरती अधिसूचना /जाहिरात दिनांक / विभाग / कार्यालयाचे नाव | प्रथम नियुक्तीचे पदनाम व दिनांक | वि.वि.शा.नि.दि.०२.०२.२०२४ नुसार पर्याय दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | श्री. विजयकुमार गुणवंत देवरे, सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी, सहसंचालक (मनपालेप), स्थानिक निधी लेखा परीक्षा, नवी मुंबई | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे वनवृत्त यांचे कार्यालय , ठाणे. दि.११.०५.२००५ | वनरक्षक, दि.०३.०२.२००६ | दि.०६.०२.२०२४ |

| अ. क्र | अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व कार्यालय | पदभरती अधिसूचना /जाहिरात दिनांक / विभाग / कार्यालयाचे नाव | प्रथम नियुक्तीचे पदनाम व दिनांक | वि.वि.शा.नि.दि.०२.०२.२०२४ नुसार पर्याय दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| २ | श्रीमती संजना संजय भोये, उपकोषागार अधिकारी, उपकोषागार कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई | जिल्हा कोषागार कार्यालय, रत्नागिरी दि. ०७.०२.२००५ | वरिष्ठ लिपीक, दि.२४.११.२००५ | दि. १२.०४.२०२४ |
| ३ | श्रीमती निकीता रमेश वसावे, सहाय्यक लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई | जिल्हा कोषागार कार्यालय, रत्नागिरी दि. ०७.०२.२००५ | लिपीक टंकलेखक, दि. २४.११.२००५ | दि. ०४.०४.२०२४ |
| ४ | श्री. कुंदन रेजपाल वसावे, उपकोषागार अधिकारी, उपकोषागार कार्यालय, देवरुख, रत्नागिरी | जिल्हा कोषागार कार्यालय, रत्नागिरी दि. ०७.०२.२००५ | लिपीक टंकलेखक, दि. २१.११.२००५ | दि. १५.०२.२०२४ |
| ५ | श्री. संतोष कुंडलिक फुगे, उपकोषागर अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे | पोलीस बिनतारी संदेश विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे दि. २०.०१.२००५ | पोलीस हवालदार (बिनतारी यंत्रचालक) २९.०६.२००६ | दि. ०६.०२.२०२४ |

**४.** उपरोक्त अधिकाऱ्यांनी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय विहित मुदतीत सादर केला असून त्यांना वित्त विभाग, शासन निर्णय, दि.०२.०२.२०२४ नुसार जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्यात येत असल्यामुळे त्याचे राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (**NPS**) मधील खाते आहरण व संवितरण अधिकारी यांनी तात्काळ बंद करावे.

**५.** उपरोक्त अधिकाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीचे (**GPF**) खाते उघडण्यात यावे व सदर खात्यात राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (**NPS**) च्या खात्यातील त्यांच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह जमा करण्यात यावी, तसेच राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (**NPS**) च्या खात्यातील राज्य शासनाच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह राज्याच्या एकत्रित निधीत वळती करण्याची आहरण व संवितरण अधिकारी यांनी तात्काळ कार्यवाही करावी. तसेच सदर अधिका-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृतीवेतन) नियम, १९८२ लागू करताना वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण- २०२४/प्र.क्र.१८/सेवा-४ दि. ०२.०५.२०२४ नुसार कार्यपध्दती अवलंबण्यात यावी.

**६.** प्रतिनियुक्तीवरील सहाय्यक लेखा अधिकारी यांच्या बाबतीत उपरोक्त अ.क्र. ४ व ५ प्रमाणे कार्यवाही करण्याकरिता लेखा अधिकारी (र. व का.), संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**७.** सदरचे आदेश संचालनालयाच्या www.mahakosh.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत. सदर प्रत अधिकृत समजण्यात यावी.

**(दीपा देशपांडे)**
**संचालक, लेखा व कोषागारे,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रति,**

१. अवर सचिव, वित्त विभाग (प्रशा. कोषा.३), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
२. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, नवी मुंबई.
३. संबधीत कर्मचाऱ्यांच्या सध्याच्या पदावरील कार्यालय प्रमुखांना सस्नेह अग्रेषित. **(प्रतिनियुक्ती कार्यालय वगळून)** अ. क्र. ४ व ५ नुसार कार्यवाही करण्याकरिता.

४. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
५. सहसंचालक, लेखा व कोषागारे (सर्व)
६. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा (सर्व)
७. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय (सर्व)
८. लेखा अधिकारी (र. व का.), संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई.

अ.क्र. ४ व ५ नुसार कार्यवाही करण्याकरिता **(प्रतिनियुक्ती वरील कार्यालयात कार्यरत अधिकाऱ्यांच्या बाबतीत.)**

९. संबंधित अधिकारी.
१०. निवड नस्ती.